WORKSHOP
2022-23

अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय

## डिपार्टमेंट ऑफ मीडिया अँड कम्युनिकेशन स्टडीज

### कार्यशाळा रिपोर्ट- २०२२-२३

डिपार्टमेंट ऑफ मीडिया अँड कम्युनिकेशन स्टडीज विभागातील बी.व्होक आणि एम.व्होकच्या विद्यार्थ्यांसाठी पब्लिक रिलेशन (JM602) या विषयांतर्गत 'Developing skills in Public Relation through media strategies' यावर आधारित दिनांक १० फेब्रुवारी २०२३ रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. जनसंपर्क क्षेत्राविषयी सखोल ज्ञान आणि करियरच्या संधी याविषयी विद्यार्थ्यांना माहिती करून देणे, हे या कार्यशाळेचे उद्दिष्ट होते. या कार्यशाळेमध्ये श्री.विकास सुधाकर पुरी (जनसंपर्क अधिकारी महावितरण) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

एखाद्या संघटनेमध्ये / संस्थेमधील जनसंपर्क अधिकाऱ्याचे कार्य, भूमिका, जबाबदाऱ्या आणि माध्यमांचा वापर याविषयी प्रत्यक्ष माहिती विद्यार्थ्यांना प्रेझेंटेशनच्या मदतीने पहिल्या सत्रामध्ये देण्यात आली. आपत्ती व्यवस्थापनमध्ये जनसंपर्क अधिकाऱ्याचे कार्य काय असते त्यासोबतच जनसंपर्क अधिकाऱ्याला कोणत्या भूमिका पार पाडाव्या लागतात. याविषयी माहिती दुसऱ्या सत्रामध्ये विद्यार्थ्यांना देण्यात आली. त्याचबरोबर या क्षेत्रातील भविष्यातील संधी आणि कामकाजाविषयी असणाऱ्या प्रश्नांवर आधारित कार्यशाळेच्या शेवटी प्रश्न-उत्तराचे चर्चासत्र देखील घेण्यात आले. जनसंपर्क क्षेत्राविषयी सविस्तर माहिती जाणून घेणे आणि प्रत्यक्षात त्याचा वापर कसा करावा, हे उद्दिष्ट या कार्यशाळेव्दारे निष्पन्न होते. टी.वाय.बी.व्होक मधील यशवंत धनवे या विद्यार्थ्याने आभार मानुन कार्यशाळेचा समारोप केला.

या कार्यशाळेकरिता महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, विभाग प्रमुख प्रा. राहुल चौधरी, RUSA समन्व्यक रामचंद्र सपकाळ यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. प्रा. रणजित पंडित, प्रा. गायत्री नंदकुमार यांचे देखील कार्यशाळेसाठी सहकार्य लाभले. विषय समन्व्यक म्हणून प्रा. ऋतुजा आगम यांनी कार्यशाळेचे आयोजन केले होते.

Noted
WDB / IQAC

तु.च.कॉलेज,बारामती
आवक नंबर: SL 296
दिनांक: 13 FEB 2023

विभागप्रमुख
राहूल चौधरी